# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषिनगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

**डॉ. प्र.रा. कडू**
कुलसचिव

Phone No. : 0724-2258372
Fax No. : 0724-2258386
E-Mail –registrar@pdkv.ac.in

**महत्वाचे**

**सन २०१९-२०२० या प्रतिवेदन वर्षासाठी विद्यापीठातील अधिकारी/ कर्मचारी यांचे ''कार्यमूल्यमापन अहवाल'' लिहिणेसाठी सुधारित वेळापत्रक...**

**वाचा :** (१) शासन निर्णय क्र. सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि. ०२ फेब्रुवारी, २०१७
(२) विद्यापीठ परिपत्रक क्र. बीएए/काअ/०१/२०२०/८२, दि.२६ फेब्रुवारी, २०२०
(३) शासन निर्णय क्र. सीएफआर-१२२०/प्र.क्र.३२/का.१३, दि. २३ एप्रिल, २०२०

## परिपत्रक

क्रमांक : बीएए/काअ/०१/२०२०/१४० दिनांक :०८/०६/२०२०

विद्यापीठातील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्याबाबत संदर्भिय शासन निर्णय व विद्यापीठ परिपत्रक अनुक्रमे क्र. १ व २ नुसार वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

तथापि, महाराष्ट्र राज्यात उद्भवलेल्या कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर अधिकारी/ कर्मचारी यांच्या कार्यालयातील उपस्थितीबाबत शासन आदेशित केल्यानुसार विद्यापीठाव्दारेही वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत व त्यानुसार कार्यालयातील कामकाज सुरू ठेवण्यात आले आहे. त्यामुळे सन २०१९-२० चे कार्यमूल्यमापन अहवालाचे प्रतिवेदन व पुनर्विलोकनाची कार्यवाही उक्त शासन निर्णयानुसार विहीत कालावधीत करणे शक्य होणार नाही.

सबब, सन २०१९-२० चे कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्यासाठी शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे सुधारित वेळापत्रक निश्चित करण्यात येत आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी देखील खालील वेळापत्रक लागू राहील.

**सन २०१९-२० चे कार्यमूल्यमापन अहवाल पूर्ण करण्यासाठी सुधारीत वेळापत्रक :**

| **कार्य** | **यापुर्वी निश्चित करण्यात आलेली अंतिम तारीख** | **सुधारित अंतिम तारिख** |
|---|---|---|
| विभाग/ कार्यालयाच्या संस्करण अधिका-यांनी/ आस्थापना अधिका-यांनी कार्यमूल्यमापन अहवालातील भाग-१ भरून कार्यमूलयमापन अहवालाचा नमुना अधिकारी/ कर्मचारी यांना देणे. | मार्च महिन्याचा शेवटचा आठवडा ते १ एप्रिल | जून, २०२० चा शेवटचा आठवडा ते १ जुलै, २०२० |
| स्वयंमूल्यनिर्धारण | १५ एप्रिल | १५ जुलै, २०२० |
| प्रतिवेदन अधिका-यांचे मूल्यमापन | ३० एप्रिल | ३१ जुलै, २०२० |
| पुनर्विलोकन अधिका-यांचे मूल्यमापन | १५ मे | १५ ऑगस्ट, २०२० |
| संबंधित अधिका-यांस प्रत उपलब्ध करून देणे | ३० जून | ३० सप्टेंबर, २०२० |

तसेच सन २०१९-२० चे कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्याचे उक्त वेळापत्रक विचारात घेता, विद्यापीठा अंतर्गत कार्यरत अधिकारी यांचे सन २०१९-२० चे कार्यमूल्यमापन अहवाल प्रतिवेदन/ पुनर्विलोकन न केल्यामुळे दिनांक १ जुलै, २०२० रोजी देय होणारी वेतनवाढ रोखण्यात येवू नये.

याबाबत आपल्या कार्यालयीन स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.

**स्वा/-**
कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

प्रति,

.............................................
.............................................

प्रतिलिपी :

(१) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती केंद्र (ARIS Cell), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना कळविण्यात येते की सदर परिपत्रक व सहपत्रित सर्व दस्तऐवज विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
(२) कुलगुरू यांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरू महोदय यांचे माहितीकरीता सादर.